# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२५
## (सकाळी १०.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | : | | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| **(२)** | **संसदीय कार्य मंत्री** | : | | महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक ३० जून, २०२५ ते दिनांक १८ जुलै, २०२५ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ११४७ आश्वासनांची यादी तसेच सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २७१ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवतील. |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी, कोकण खोरे विकास महामंडळ)** | : | **(क)** | तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ख)** | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक वित्तीय अहवाल व लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| **(४)** | **खनिकर्म मंत्री** | : | | मॉयल लिमिटेड यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा त्रेसष्टावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : नियम समितीचा अहवाल सादर करणे.**

**चार : नियम समितीचा प्रस्ताव**

"विधानसभा नियम समितीच्या आज दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये कोणतीही सुधारणा करण्याची सूचना देण्यासंबंधातील म.वि.स. नियम २२५(१) व २२५(३) मधील १० दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती म.वि.स. नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत उक्त अहवालाच्या बाबतीत शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंतच्या कालावधीची करण्यात यावी."

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**सहा : औचित्याचे मुद्दे**

**सात : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, अमिन पटेल, अस्लम शेख, साजिद पठाण, रामदास मसराम, अनिल मांगुळकर, डॉ.विश्वजित कदम, डॉ. ज्योती गायकवाड, श्री. संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील पवई येथील आर.ए. स्टुडिओमध्ये ऑडिशनच्या नावाखाली परभणी, लातूर आदी जिल्ह्यांसह राज्यातील विविध भागांतून आलेल्या १५ वर्षांखालील १७ मुलांसह एकूण २० जणांना रोहित आर्या नामक व्यक्तीने ओलीस ठेवल्याची व त्या अपहरणकर्त्याचा पोलिसांनी एन्काऊंटर केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२५ च्या अखेरच्या आठवड्यात घडणे, "मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा" या अभियानातील महत्त्वाचा घटक असलेल्या पी.एल.सी. स्वच्छता मॉनिटर प्रकल्पातील सुमारे दोन कोटी रुपयांहून अधिक निधीच दिला नसल्याचा आरोप संबंधित रोहित आर्याने केला असणे, सदर प्रकल्पांतर्गत राज्यातील काही शाळांना जाणूनबुजून चुकीचे गुण देऊन त्याच शाळांना विजेते घोषित करण्यात आल्याचा गौप्यस्फोट रोहित आर्याने केला असणे, तसेच त्या संदर्भात त्याने तत्कालीन शिक्षण मंत्र्यांच्या निवासस्थानासमोर अनेक वेळा उपोषण केले असणे, पोलिस कारवाईत मृत्यूमुखी पडलेल्या रोहित आर्या प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने दिले असणे, परंतु अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्यामुळे जनमानसांत पसरलेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या घटनेचा सखोल तपास करण्यासाठी आयोगाने विशेष तपास पथकाची (SIT) नियुक्ती करुन संबंधित दोषीवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. अतुल भातखळकर, चेतन तुपे, सुरेश भोळे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. योगेश सागर, देवराव भोंगळे, सुधीर मुनगंटीवार, मंगेश चव्हाण, महेश लांडगे, अनंत (बाळा) नर, सुनिल प्रभू, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार,**

**नानाभाऊ पटोले, अमीन पटेल, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. अमित विलासराव देशमुख, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. साजिद पठाण, शिरीषकुमार नाईक, रामदास मसराम, संजय मेश्राम, हेमंत ओगले, अनिल मांगुळकर, मुरजी पटेल वि. स. स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या अंदाजे एक लाखापेक्षा जास्त असताना, संपूर्ण शहरासाठी केवळ ८ निवारा केंद्रे (Shelters) कार्यरत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, ही समस्या केवळ मुंबईपुरती मर्यादित नसून ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, बदलापूर, अंबरनाथ आणि उल्हासनगर येथेही असणे, भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (Sterilization) आणि निवारा यासाठी मा. उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला दिलेल्या निर्देशांची अद्याप पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नसल्याने नवीन निवारा केंद्रे उभारण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज असणे, कार्यरत निवारा केंद्रांना आणि भविष्यात उभारल्या जाणाऱ्या केंद्रांना पुरेसे पालिका कर्मचारी, पशुवैद्यक, अन्न-पाणी पुरवण्यासाठी आवश्यक निधी आणि संसाधनांची तरतूद करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व शहरात विशेषत: मुंबई, ठाणे, पुणे शहरात मोठया प्रमाणात हजारो लोकांना श्वानांनी चावा घेतल्यामुळे झालेले मृत्यू, मुंबईत गेल्या वर्षात ७० व ठाण्यात १२ हजारापेक्षा जास्त नागरीकांना भटक्या श्वानांनी चावा घेतल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले असणे, तसेच जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील नागेश्वर कॉलनी येथे दिनांक १ जून २०२५ रोजी अंगणात खेळत असलेल्या ४ वर्षाच्या बालकावर भटक्या श्वानांनी अचानक जीवघेणा हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याने त्याचा झालेला मृत्यू, यास्तव राज्यात भटक्या कुत्र्यांसाठी निवारा केंद्र (Shelters) उभारण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याच्यादृष्टीने तसेच भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (Sterilization) करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.तुकाराम काते, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहर व उपनगरांमधील झोपडपट्ट्यांमध्ये साफसफाई व स्वच्छता करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सन २००१ पासून "दत्तक वस्ती योजना" सुरू केली असणे, त्यामध्ये सन २००१ मध्ये नऊशे रुपये मानधन देऊन नऊ हजार कामगार काम करीत असणे, त्यानंतर सन २०१३ पर्यंत ४८०० रुपये पर्यंत मानधनामध्ये वाढ झाली असणे, तसेच दीपावलीमध्ये २००० रुपये बोनस मिळत असणे, पण सन २०१३ मध्ये महानगरपालिकेने जुनी दत्तक वस्ती योजना बंद करून नवीन "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान वस्ती स्वच्छता योजना" या नावाने योजना अंमलात आणली असणे, या योजनेमध्ये सध्या १२००० कामगार काम करीत असणे, या कामगारांना फक्त रुपये ५४०० मासिक पगार मानधन म्हणून दिले जात असणे, या कामगारांना पूर्वी दिल्या जाणारा दिवाळी बोनस सुद्धा बंद करण्यात आला असणे, महानगरपालिकेच्या सफाई कामगारांप्रमाणेच काम करत असताना देखील त्या कामगारांप्रमाणेच या योजनेतील

कामगारांना वेतन मिळत नसल्याचा अहवाल कामगार आयुक्तांनी महापालिकेला दिलेला असणे, त्याची अंमलबजावणी महानगरपालिकेकडून होत नसणे, अनेकदा या सफाई कामगारांच्या जीवाला धोकाही होत असताना अशा परिस्थितीत हे कामगार काम करत असणे, या कामगारांना किमान वेतन व आरोग्य विमा, सुरक्षा विमा कवच सुविधा मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर जिल्हयामधील भद्रावती तालुक्यात मा. न्यायालयाने स्पष्ट आदेश दिल्यानंतरही शेतजमीनीच्या फेरफाराचा निर्णय न घेता तहसिल प्रशासनाकडून टाळाटाळ केल्यामुळे तहसिलदारांच्या निष्क्रियतेला कंटाळून परमेश्वर ईश्वर मेश्राम या शेतक-याने तहसिल कार्यालयातच विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडणे, मृताची मौजा कुरडा गावात वडिलोपार्जीत शेती असणे, त्यांचे वडील जिवंत असताना त्यांनी शेतजमीन विधीवत विक्री करून मुलगा परमेश्वर मेश्राम यांच्या नावे करणे, मा. न्यायालयाने देखील उक्त प्रकरण मान्य करणे, असे असतानाही तहसिल कार्यालय भद्रावती मधून फेरफाराबाबत विविध कारणे दाखवून टाळाटाळ करणे, प्रशासकीय यंत्रणेच्या निष्क्रीय कार्यपध्दतीला कंटाळून या शेतक-याने विष प्राशन करुन आत्महत्या करणे, या गंभीर घटनेकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अतुल भातखळकर, काशिनाथ दाते, मोहन मते, सुनिल प्रभू, ज्ञानेश्वर कटके, अमित साटम,श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. शंकर मांडेकर, प्रतापराव पाटील चिखलीकर, आशुतोष काळे, सत्यजित देशमुख, अमित विलासराव देशमुख, संजय मेश्राम, अमित झनक, विकास ठाकरे, साजिद पठाण, अस्लम शेख, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, चेतन तुपे, ॲड राहूल कुल, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री. रामदास मसराम, राजकुमार बडोले, दिलीपराव बनकर, दौलत दरोडा, रोहित पवार, विठ्ठल लंघे, उमेश यावलकर, अब्दुल सत्तार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्याच्या विविध भागांमध्ये बिबट्यांची प्रचंड दहशत वाढलेली असून बिबट्या मानवी वस्तीत शिरल्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये व त्या दरम्यान वारंवार निदर्शनास येणे, माहे सप्टेंबर २०२५ मध्ये कळस (ता. पारनेर) येथे एका तरुणाचा व पारनेर शहरात एका तीन वर्षीय बालिकेचा, खारेकर्जुने (ता. अहिल्यानगर) येथे पाच वर्ष मुलीचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे उघडकीस येणे, जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ पर्यंत अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात २० जणांचा मृत्यू झालेला असणे, गोंदियाच्या तिरोडा तालुक्यातील इंदोरा निमगाव येथे वडिलांसोबत शेतात गेलेल्या बालिकेवर बिबट्याने हल्ला केल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना, तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील चिचपल्ली वन परिक्षेत्रांतर्गत चिरोली बीट भगवानपूर कक्ष क्रमांक ६९६ मध्ये गुरे चराईसाठी गेलेल्या

गुराख्यावर वाघाने हल्ला केल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी घडली असणे, पुणे जिल्हयातील ता.शिरुर, पिंपरखेड गावातील १३ वर्षीय मुलाचा बिबट्याच्या हल्यात मृत्यू झाल्याची घटना दिनांक २ नोव्हेंबर, २०२५ रोजी घडलेली असताना याआधी १५ दिवसापूर्वी ५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा बिबट्याच्या हल्यात मृत्यु झाल्याची घटना घडली असणे, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर यांसह इतर जिल्ह्यांमध्ये बिबट्यांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढत होत असून सध्या राज्यात पाच हजारांपेक्षा जास्त बिबटे असणे, वन विभागाने जंगलांमध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार २२८५ बिबटे असल्याचे आढळून येणे, मात्र जंगलाबाहेर द्राक्ष, ऊस व कापसाच्या शेतात बिबट्यांची मोठ्या प्रमाणात पैदास होणे, जंगलाबाहेर सर्व्हेक्षण केलेले नसणे, केवळ जुन्नर वन विभागामध्येच दोन हजार बिबटे असणे, पाच हजारपेक्षा जास्त बिबटे असतांना केवळ पाच बिबट्यांची नसबंदी करण्याची परवानगी मिळालेली असल्याची धक्कादायक महिती उघडकीस येणे, मानवी क्षेत्रात बिबट्या येऊन लहान मुले, शेळी व पाळीव कुत्र्यांना भक्ष्य करीत असणे, मागील ३ वर्षात सुमारे १७ हजार पाळीव प्राणी व २५० पेक्षा जास्त मनुष्यांची बिबट्याने हल्ले करुन शिकार केलेली असणे, त्यामुळे राज्यातील नागरीकांची जिवीतहानी व मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून मानवी जिवीतास मोठा धोका निर्माण होणे, यासाठी वाघ व बिबटयांपासून मानवांचे संरक्षण करण्यासाठी वन विभागातील वनाधिकारी व वन रक्षकांची पद भरण्याची आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन कार्यवाही व उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.वने मंत्री यांचेकडे दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ रोजी तसेच वारंवार केलेली असतांनाही, सदरबाबत कार्यवाही करण्यास दिरंगाई, टाळाटाळ केली जात असल्याने राज्यातील नागरीकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले असणे, बिबट्यांच्या वाढत्या हल्यांमुळे नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण झालेला असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२५

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

---

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ९ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

**(ख) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १० - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

**(ख) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन

दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ७ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

**(ख) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४) (क) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५) (क) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(६) (क) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

नऊ : **सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, शेखर निकम, प्रशांत बंब, दिपक केसरकर, संजय बनसोडे, संभाजी निलंगेकर-पाटील, तानाजी सावंत, अनिल पाटील, सुभाष देशमुख, रमेश बोरनारे, राजकुमार बडोले, सुरेश धस, राजेंद्र गावित, दौलत दरोडा, तानाजी मुटकुळे, विजय शिवतारे, प्रताप पाटील-चिखलीकर, अभिमन्यू पवार, राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा**

खोडके, सर्वश्री बबनराव लोणीकर, प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. प्रवीण दटके, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, विजय देशमुख, विलास तरे, काशिनाथ दाते, सुरेश भोळे, चंद्रदिप नरके, सचिन पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, रमेश कराड, मंगेश कुडाळकर, मंगेश चव्हाण, किशोर पाटील, समाधान आवताडे, शांताराम मोरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री प्रकाश सुर्वे, मोहन मते, निलेश राणे, हरिष पिंपळे, तुकाराम काते, समीर कुणावार, अशोक पाटील, श्रीमती अनुराधा चव्हाण, श्री. चंद्रकांत सोनवणे, श्रीमती मोनिका राजळे, श्री. बालाजी कल्याणकर, श्रीमती सीमाताई हिरे, श्री. सुहास कांदे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री संजय गायकवाड, संतोष दानवे, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री चैनसुख संचेती, महेंद्र थोरवे, श्रीमती श्वेता महाले, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री महेंद्र दळवी, नारायण कुचे, चंद्रकांत पाटील, किर्तीकुमार भांगडीया, संतोष बांगर, किशोर जोरगेवार, विश्वनाथ भोईर, गोपिचंद पडळकर, दिलीप लांडे, राजेश पवार, महेश शिंदे, राणाजगजितसिंह पाटील, आमश्या पाडवी, हिकमत उढाण, सुरेश खाडे, बाबुराव कदम-कोहळीकर, विक्रम पाचपुते, अमोल खताळ, सत्यजित देशमुख, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री मनोज घोरपडे, आनंद तिडके, डॉ. विजयकुमार गावित, सर्वश्री मुरजी पटेल, राजेश पाडवी, अमोल पाटील, विनोद अग्रवाल, देवराव भोंगळे, सुहास बाबर, करण देवतळे, विलास भुमरे, तुषार राठोड, राजेश मोरे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, विठ्ठल लंघे, सुमित वानखेडे, किरण सांमत, डॉ. आशिष देशमुख, ॲड. राहुल कुल, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री महेश लांडगे, शिवाजी पाटील, सिध्दार्थ शिरोळे, शंकर जगताप, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री देवेंद्र कोठे, अमल महाडिक, सुधीर गाडगीळ, राघवेंद्र पाटील, प्रविण तायडे, राजेश बकाने, अमोल जावळे, प्रकाश भारसाकळे, समीर मेघे, उमेश यावलकर, प्रताप अडसड, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, काशिराम पावरा, अनुपभैय्या अग्रवाल, किसन वानखेडे, चरणसिंग ठाकूर, राजेश वानखडे, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाले, संजय पुराम, राजू तोडसाम, भीमराव केराम, दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री भिमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, रविशेठ पाटील, राहुल आवाडे,

**राजेंद्र यड्रावकर-पाटील, शरद सोनवणे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ मंडळे यामध्ये अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे नद्या व नाल्यांना आलेले पूर, विदर्भ-मराठवाडयातील शेतकऱ्यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकरी बांधव अभूतपूर्व संकटात सापडले असणे, शेती हा केवळ उपजीविकेचा मार्ग नाही तर अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नैसर्गिक आपत्तीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असणे, शाश्वत शेती समृध्द शेतकरी हे लक्ष्य समोर ठेऊन व सर्व निकष बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून सर्वंकष मदत तात्काळ देण्यात येणे, नुकसानाबाबत मोबाईल व ड्रोनद्वारे काढण्यात आलेले फोटो स्विकारण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असणे, युती शासनाने तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे ऐतिहासिक मदत पॅकेज जाहिर करून शेतकऱ्यांना तात्कालीक दिलासा देण्यात येणे, जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना ४७ हजार रुपये प्रति हेक्टर रोख तसेच नरेगा योजनेच्या माध्यमातून ३ लाख रुपये प्रति हेक्टर अतिरिक्त मदत देण्यात येणे, बुजलेल्या विहिरींसाठी ३० हजार रुपये भरपाई देण्यात येणे, पडझड झालेल्या घरांच्या जागी नवीन घरे बांधण्याकरिता प्रधानमंत्री आवास योजनेतून १०० टक्के मदत देण्यात येणे, दुधाळ जनावारांकरिता जवळपास ३७ हजार ५०० रुपयांपर्यंत प्रति जनावर मदत देण्यात येणे, एनडीआरएफमध्ये असलेली ३ जनावरांपर्यंतची मर्यादा शिथिल करण्यात येणे, ओढकाम करणाऱ्या जनावरांकरिता ३२ हजार रुपये प्रति जनावर देण्यात येणे, संबंधित भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्यात येणे, वीज बिलाची वसूली थांबविण्यात येणे, राज्यातील २ हजार ५९ मंडळांमध्ये क्रॉप डॅमेज झालेले निदर्शनास आल्याने त्याठिकाणी ६५ मिलीमीटरची अट शिथिल करुन मदत करण्याचा निर्णय करण्यात येणे, शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा असला पहिजे आणि भविष्यात शेती समृध्द झाली पाहिजे या हेतूने राज्याचे मा. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच अनेक मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन व नुकसानाबाबत त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन त्यांना तातडीने मदत देण्याची यंत्रणा उभारली असणे, बिबटे, वाघ अशा

हिंस्र व वन्य प्राण्यांचे हल्ले वाढले असल्याने शेतकऱ्यांना मृत्यूस सामोरे जावे लागणे, या प्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शेताला कुंपण घालण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची आवश्यकता, पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करून राबविण्याची आवश्यकता, सर्प दंशाचे प्रमाण ग्रामीण भागात वाढले असल्याने मृत झालेल्या व्यक्तींना गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना लागू करण्याची व त्यामध्ये मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना २ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची आवश्यकता, विदर्भ, मराठवाडयासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने उचललेली ठोस पाऊले, विदर्भ, मराठवाडयाशी संबंधित वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण करून बळीराजाला सिंचनासाठी मुबलक पाणी पुरवठा करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, अमरावती येथे मेघा टेक्सटाईल पार्कची केलेली निर्मिती, विदर्भात रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अतिदुर्गम गडचिरोली जिल्हयात उभारण्यात येत असलेले उद्योग, "मराठवाडा वॉटर ग्रीड" हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने घेतलेला निर्णय, गडचिरोली नवीन रेल्वे मार्ग, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प इत्यादी कामांना गती देण्यात येणे, विदर्भासाठी ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांना मान्यता देण्यात येणे, राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसहाय्य योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती देण्यात येणे, महावितरणच्या माध्यमातून शेतकऱ्यांना १ लाख सौर कृषी पंपाचे वाटप करण्यात येणे, मुबलक विजेसाठी सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यात येणे, या नैसर्गिक आपत्तीमध्ये दुर्देवाने मृत्यू झालेल्या व जखमी झालेल्या शेतकऱ्यांनाही शासनाकडून मदत देण्यात येणे, कुक्कुटपालनाला १०० रुपये प्रति कोंबडी मदत देण्यात येणे, पीक विमा उतरविलेल्या शेतकऱ्यांना विम्याद्वारे प्रति हेक्टर रुपये १७ हजार मदत देण्यात येणे, बियाणे व इतर कामांसाठी प्रतिहेक्टर रुपये १० हजार सर्वसाधारण मदत देण्यात येणे इ. मार्गाने आपत्तीग्रस्त बाधित कुटुंबांना सर्वंकष मदत देऊन शेतकऱ्यांप्रती असलेले उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न करणे, अशारीतीने प्रभावी मदत कार्यातून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यात हे शासन जागृत असणे, विदर्भ-मराठवाड्यासह संपूर्ण राज्याचा विकास व राज्यातील शेतकरी समृध्द होण्याबाबत सभागृहात विचार-विनिमय करून

राज्यातील आपदग्रस्त शेतकरी स्वतःच्या पायावर उभा रहावा याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजी बॅलेटद्वारे काढण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमार्फत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचे लाभ देण्याबाबत" या विषयावरील श्री.संतोष दानवे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७१९३ ला दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर, वि.स.स.**

"पिंपरी-चिंचवडमधील (जि.पुणे) येथे पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केल्याबाबत" या विषयावरील श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७५६३ ला दिनांक ०७ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ८ डिसेंबर, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा

शासकीय मुद्रणालय, नागपूर